लोकमत

## महत्त्वाचे

# 'निती' आयोगाचे उपाध्यक्ष राजीव कुमार

नवी दिल्ली : ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. राजीव कुमार यांची 'निती' आयोगाचे पुढील उपाध्यक्ष म्हणून सरकारने शनिवारी नियुक्ती केली. सध्याचे उपाध्यक्ष डॉ. अरविंद पनगढिया येत्या ३१ ऑगस्ट रोजी निवृत्त झाल्यानंतर डॉ. राजीव कुमार या पदाची सूत्रे स्वीकारतील. याखेरीज दिल्लीतील 'एम्स'मधील बालरोग विभागाचे प्रमुख डॉ. विनोद पॉल यांचीही आयोगावर सदस्य म्हणून नेमणूक झाली आहे. डॉ. कुमार ऑक्सफर्ड व लखनऊ विद्यापीठाचे डॉक्टरेट आहेत.